महाराष्ट्र शासन

क्रमांक- नाहप्र २०१३/(७५/१३)माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०२ ऑगस्ट, २०१३.

प्रति,

शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :-** सीबीएसई/आयसीएसई /आयबी / आयजीसीएसई इत्यादी देशातील व विदेशातील अभ्यासक्रमांशी संलग्नित होणा-या शाळांचे नाहरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्याबाबत.

**संदर्भ :-** समक्रमांकाचे दि.१९ जून, २०१३ चे पत्र

वरील विषयावरील संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

२. संदर्भाधीन पत्रान्वये सीबीएसई/आयसीएसई /आयबी / आयजीसीएसई इत्यादी देशातील व विदेशातील अभ्यासक्रमांशी संलग्नित होणा-या शाळांच्या संदर्भातील मान्यता / ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने करावयाच्य कार्यवाहीबाबतच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

उपरोक्त संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने येथे स्पष्ट करण्यात येते की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या अधिनियमांमधील तरतूदी विचारात घेता यापूर्वी शासनस्तरावरुन तात्पुरत्या व कायमस्वरुपी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व सद्यःस्थितीत शासन परवानगीशिवाय सुरु असलेल्या विवक्षित शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १८ व १९ च्या अनुषंगाने विहित केलेले निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असतील तर अशा शाळांना शासन स्तरावरुन परवानगी आहे असे गृहित धरुन मान्यता देण्याची कार्यवाही संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरुन करण्याबाबतच्या



Scanned by CamScanner

सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात. तसेच, त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा. जेणे करुन अशा शाळांना शासन स्तरावरुन ना हरकत प्रमाणपत्र देण्याची पुढील कार्यवाही करता येणे शक्य होईल.

(सु.न. जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-**

१. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
नागपूर/अमरावती/नाशिक/पुणे/मुंबई/औरंगाबाद/कोल्हापूर
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्व जिल्हा परिषदा
३. मा.मंत्री/राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
४. मा.अपर मुख्य सचिव यांचे स्वी.स.
५. निवडनस्ती/माशि-१

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

क्रमांक- नाहप्र २०१३/(७५/१३)माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-१९जून, २०१३.

प्रति,

**शिक्षण संचालक,**
माध्यमिक व उच्च माध्यमिक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :-** सीबीएसई/आयसीएसई शाळांना देण्यात आलेल्या नाहरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरणाबाबत.

**संदर्भ :-** १. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचे क्र.प्राथ२/कोवि/नशापप्र/१२/१९७०२-१४, दि.२८/०३/२०१३ चे पत्र

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचे क्र.प्राथ २/कोवि/नशापप्र/१२/२५०६३-६४, दि.७/०५/२०१३ चे पत्र

३. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचे क्र.प्राथ/ब/३२५०/२०१३, दि.३० मार्च, २०१३

वरील विषयावरील संदर्भाधीन क्र.१ ते३ पत्रे कृपया पहावीत.

२. शासन निर्णय क्र.नाहप्र २००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक ७/०८/२००९ अन्वये सी.बी.एस.ई./आय.सी.एस.ई. इत्यादी अभ्यासक्रमासाठी संबंधित मंडळाच्या संलग्नतेसाठी राज्यातील विविध संस्थांना शासन स्तरावरुन थेट ना-हरकत प्रमाणपत्रे देण्यात येत होती.

३. थेट ना हरकत प्रमाणपत्रे प्राप्त झालेल्या संस्थानी परस्पर शाळा सुरु केल्या आहेत. त्यामुळे ज्या शाळांना तात्पुरत्या स्वरुपात ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे त्या शाळा तीन वर्षांच्या कालावधीनंतर ना हरकत प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी आलेल्या आहेत, या शाळांना तसेच यापूर्वी ज्या शाळांना कायमस्वरुपी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे अशा शाळांच्या बाबतीत त्यांना शासन स्तरावरुन मान्यता देण्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे.



Scanned by CamScanner

४. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ संपूर्ण देशामध्ये दिनांक ०१ एप्रिल, २०१० पासून अंमलात आला आहे. या अधिनियमांमधील तरतूदी विचारात घेता यापूर्वी शासनस्तरावरुन तात्पुरत्या व कायमस्वरुपी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व सद्यस्थितीत शासन मान्यतेशिवाय सुरु असलेल्या विवक्षित शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १८ व १९ च्या अनुषंगाने विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करतात किंवा कसे याबाबतची पडताळणी संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी करणे आवश्यक राहील. जर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असतील तर त्यानुसार प्राप्त होणा-या मान्यतेच्या / अहवालाच्या अनुषंगाने अशा शाळांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची पुढील कार्यवाही शासनस्तवरावरुन करणे शक्य होईल. याबाबतच्या उपरोक्त सूचना सर्व संबंधितांना आपल्यामार्फत कळविण्यात याव्यात.

(सु.न. जोशी)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-**

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
नागपूर/अमरावती/नाशिक/पुणे/मुंबई/औरंगाबाद/कोल्हापूर

Scanned by CamScanner